ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २० फेब्रुवारी, १९५७ | अंक ८

## विविध माहिती

**नाशिक येथें कॉमर्स कॉलेज**—नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीला कॉमर्स कॉलेज काढण्यासाठी तेथील सुप्रसिद्ध विड्यांचे कारखानदार श्री. भिकुसा यमासा ह्यांनीं १॥ लाख रुपयांची देणगी दिली आहे. नाशिक येथील एच. पी. टी. कॉलेज ह्याच संस्थेतर्फे चालविण्यांत येत आहे.

**जर्मनींतील सैन्य कमी करणार**—ब्रिटननें आपल्या संरक्षण-विषयक खर्चांत कपात करण्याचें ठरविलें आहे. खर्चांत बचत करण्यासाठी म्हणून जर्मनीमधील ब्रिटिश लष्कर कमी करण्यांत येणार आहे. सध्यां जर्मनीमध्यें ब्रिटनची ८०,००० फौज आहे. ती ह्यापुढें ५०,००० च ठेवण्यांत येणार असल्याचें समजतें.

**रशिआचें इजिप्तला कर्ज**—सोव्हिएट रशिआच्या सरकारनें इजिप्तच्या सरकारला २० कोटी डॉलर्सचें औद्योगिक कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे असें समजतें. मध्यपूर्वेमधील देशांना रशिआकडून खरी भीति आहे ती लष्करी आक्रमणाची नसून आर्थिक पकडीची आहे, असें मत अमेरिकेंत व्यक्त करण्यांत येत आहे.

**वृत्तपत्रांचा कागद महागला**—कॅनडामधील इंटरनॅशनल पेपर सेल्स कंपनीनें वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाच्या किंमतींत टनामागें ४ डॉलर्सची वाढ केली आहे. इतर कंपन्यांनींहि कागदाच्या भावांत अशीच वाढ केल्यामुळें न्यूयॉर्कच्या बाजारांत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाची किंमत दर टनाला १३४ डॉलर्सपर्यंत चढली आहे.

**पाश्चात्य व पौर्वात्य संगीत**—सुप्रसिद्ध भारतीय सतार-वादक श्री. रविशंकर ह्यांना न्यूयॉर्कमधील कांहीं पाश्चात्य संगीत-कलाकारांनीं खास खाना दिला. ह्या प्रसंगीं श्री. रविशंकर ह्यांनीं वाजविलेली रागदारी त्यांना फार आवडली. उलटपक्षीं, श्री. रविशंकर ह्यांनाहि 'जॅझ' हा संगीत प्रकार आवडला.

**जर्मन कंपनीचें साह्य**—दुसऱ्या महायुद्धांत जर्मनींतील आय. जी. फारबेन ह्या रासायनिक कंपनींत हजारों ज्यू व इतर कैद्यांनीं सक्तीची मेहनत केली होती. त्यांना आर्थिक साह्य म्हणून कंपनीनें ३ कोटी मार्कसची रकम देण्याचें ठरविलें आहे. ही रकम सुमारें १ कोटी डॉलर्स होईल.

**जागतिक बँकेचें उत्पन्न**—१९५६ च्या दुसऱ्या सहामाहींत जागतिक बँकेला १·८ कोटी डॉलर्स निवळ उत्पन्न झालें. गेल्या सालाच्या अखेरीस बँकेजवळील एकूण गंगाजळी २५ कोटी, २७ लाख डॉलर्स होती. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासद असलेल्या राष्ट्रांना उत्पादकयोजनांसाठी बँक कर्ज पुरविण्याचें कार्य करीत असते.

**बर्नार्ड शॉ ह्यांची सायकल**—दिवंगत ब्रिटिश नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ जी सायकल वापरीत असत, तिची विक्री करण्याची जाहिरात लंडन टाइम्समध्यें आली होती. सायकल इतकी पुराणी आहे कीं ती वस्तुसंग्रहालयांत ठेवण्याच्या लायकीची आहे. बर्नार्ड शॉ १८९५ सालापासून सायकल वापरूं लागले. तीच ही सायकल असावी असा अंदाज आहे.

**रशिआचें अंदाजपत्रक**—रशिआच्या सुप्रीम सोव्हिएटनें १९५७ सालचें अंदाजपत्रक मंजूर केलें आहे. अंदाजपत्रकांत ९९७२ कोटी रुबल्स संरक्षणासाठी राखले आहेत. ही रकम एकूण अंदाजपत्रकाच्या ६ ते ७ टक्के आहे. सांस्कृतिक विकास व समाजहित ह्यांच्यासाठी संरक्षण खर्चाच्या दुप्पट रकम मंजूर करण्यांत आली आहे.

**विणकरांसाठी वसाहती**—मद्रास राज्यांतील हातमाग विणकरांची राहण्याची सोय करण्यासाठी आणखी तीन वसाहती स्थापन करण्यांत येणार आहेत. भारतीय सरकारनें वसाहतींच्या योजनांना मान्यता दिली आहे. योजना अंमलांत आणण्यासाठी भारतीय सरकार मद्रास सरकारला २·८६ लाख रुपये कर्ज देणार आहे.

**ऑस्ट्रेलिआकडून रेल्वेचे डबे**—कोलंबो मदतयोजनेप्रमाणें भारताला ऑस्ट्रेलिआकडून मालवाहतुकीचे २,००० व प्रवाशांच्या वहातुकीचें २४ डबे मिळणार आहेत. ह्या मालापैकीं कांहीं माल भारतांत आला आहे. बाकीचा माल मात्र वहातुकीच्या व इतर अडचणींमुळें एप्रिल महिन्याच्या सुमारास येऊं शकेल. ऑस्ट्रेलिआकडून भारताला ध्वनिक्षेपणाचें साहित्यहि मिळत आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## अहमदनगर जिल्ह्यासाठी मध्यवर्ती सहकारी बँक

### प्राथमिक भांडवलासाठी प्रयत्न

अहमदनगर जिल्ह्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्याचे हेतूनें येथील कार्यकर्ते गेलीं तीन वर्षे विचार-विनिमय करीत आहेत. अशा बँकेच्या उपयुक्ततेबद्दल निरनिराळ्या सभा-संमेलनांतून प्रचारकार्य चालू आहे.

अनेक जिल्ह्यांसाठी मध्यवर्ती सहकारी बँक असावी असें सरकारचें धोरण असून नगर जिल्ह्यांत तातडतोब मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे; व त्यासाठी लागणारें प्राथमिक शेअर भांडवल गोळा करण्याचा आदेश दिला आहे. अशी बँक स्थापन झाल्यावर तिचें सुमारें तीन लक्ष रुपये किंमतीचे शेअर्स सरकार खरीदणार आहे.

ह्या परिस्थितीचा योग्य फायदा घेण्यासाठी नगर जिल्ह्यांतील सर्व सहकारी सोसायट्यांनीं, कार्यकर्त्यांनीं व शेतकऱ्यांनीं त्वरित पुढें येऊन जरूर तें प्राथमिक शेअर भांडवल गोळा करणेचे एकवटून प्रयत्न केले पाहिजेत. सुरवातीस निदान रु. पांच लाखांपर्यंत शेअर भांडवल जमविलें जाईल अशी अपेक्षा आहे.

नगर जिल्हा सहकारी बोर्डानें यापूर्वीच कांहीं प्राथमिक शेअर भांडवल जमा करून धी प्रपोजड् नगर डि. सें. को-ऑप. बँकेचे नांवें नगर येथील बाँबे स्टेट को-ऑप. बँकेचे शाखेंत खातें उघडलें आहे. त्याचप्रमाणें स्टेट को. बँकेच्या या जिल्ह्यांतील सर्व शाखांना वरील प्रपोजड् बँकेचे खातीं येणारे पैसे स्वीकारणेबद्दल सूचना देण्यांत आल्या आहेत. प्रपोजड् बँकेच्या प्रत्येक शेअरची दर्शनी किंमत रु. १०० आहे.

तरी सदर बँकेच्या शेअरसाठी प्राथमिक भांडवल गोळा करणेसाठी कार्यकर्त्यांनीं जरूर ते प्रयत्न करावेत अशी विनंति आहे.

| | |
|---|---|
| ह. कृ. काळे | स. वा. पांगळ |
| चेअरमन | असि. रजिस्ट्रार |
| नगर डि. को. बोर्ड, लि. | को. सो. नगर |

---

**भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना**—भारतीय सरकार भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना काढण्याच्या विचारांत आहे. कारखान्यांत कापड गिरण्या, मोटारी, इत्यादि अनेक प्रकारच्या कारखान्यांना लागणारीं यंत्रें तयार करण्यांत येतील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत दरसाल सर्व प्रकारच्या मिळून ६५,००० मोटारी तयार होऊं लागतील.

**नेपा कागदाची गिरणी**—मध्यप्रदेश सरकारनें पुरस्कृत केलेली नेपा कागदाची गिरणी भारतीय सरकार आपल्या व्यवस्थेखाली घेणार असल्याचें समजतें. १९५६ च्या एप्रिल पासून कारखान्यांत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचें उत्पादन होऊं लागलें. आतां रोज सरासरी ६० ते ६५ टन कागद तयार होऊं लागला आहे.

**नवीन विमानतळ**—आंध्र राज्यांत नागार्जुन सागर येथें बांधण्यांत यावयाच्या धरणाजवळ विमानें उतरण्याची जागा तयार करण्यांत येणार आहे. धरण बांधून झाल्यावर त्याच्या मध्यभागीं एक बेट तयार होईल. त्यावर बुद्धविषयक प्राचीन वस्तूंचें संग्रहालय उभारण्यांत येणार आहे. विमान उतरण्याच्या सोयीचा उपयोग हौशी प्रवाशांना होईल.

## मित्रानें नैमित्तिक उसने पैसे देणें सावकारी होते काय?

लायसेन्स नसणारा व्याजाच्या बोलीनें रक्कम कर्जाऊ देऊं शकतो काय? असा प्रश्न नेहमीं उपस्थित होतो. मित्राकडे थोडी रक्कम मागितली, कीं, तो सावकारी कायद्याकडे बोट दाखवितो.

"ह्या मित्राचें म्हणणें बरोबर नाहीं. त्याला सावकारी कायदा तरी नीट माहिती नसेल, किंवा कर्ज देणें टाळण्यासाठी त्यानें कायद्याचें बुजगावणें दाखविलें असेल. कायदा न मोडतां तो व्याजानें कर्ज देऊं शकतो.

"सावकारीचा लायसेन्स नसतांनाहि कोणीहि मनुष्य दुसऱ्याला व्याजानें केवढीहि रक्कम नैमित्तिक देऊं शकतो. गरजू माणसाची केव्हां तरी कर्जाची गरज भागविल्यानें (व्याज घेऊनहि) तो धंदेवाईक सावकार बनत नाहीं. असा कायदा नसता, तर गरजू स्नेही किंवा नातेवाईक ह्यांना पैशाची मदत करणें अशक्य बनलें असतें. सावकारी कायद्याच्या कक्षेंत यावयाला कर्जें देणारा मनुष्य हा सावकारीचा धंदा करणारा असावयास हवा; म्हणजे असा व्यवहार तो कांहीं काळ सतत चालू ठेवत असला पाहिजे. फक्त अशाच धंदेवाल्यांना सावकार म्हणून नोंदून घ्यावें लागतें."

एन. के. एम्. संतोक,

बॉंबे मनीलेंडर्स ॲक्ट, कलमें २ (२), (९), व (१०).

दि टाइम्स ऑफ इंडियाची रविवार आवृत्ति, १०-२-५७.

---

## जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या हिशेबाची छाननी

### एकूण विक्रीशीं ठोक नफ्याचें प्रमाण (%)

| उद्योगधंदा | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ कपास गिरण्या | ७.७ | ९.१ | ४.० | ५.६ | ५.३ | ६.३ |
| २ ताग गिरण्या | ८.१ | ७.६ | ४.१ | ६.२ | ५.९ | ६.४ |
| ३ इतर टेक्स्टाइल्स | १३.६ | ५.४ | ५.५ | ९.२ | १३.० | ९.२ |
| ४ लोखंड व पोलाद | १४.० | १७.९ | १७.२ | १८.७ | २१.५ | १८.१ |
| ५ इंजिनिअरिंग | ८.९ | ८.६ | ८.१ | ७.५ | ७.७ | ८.१ |
| ६ सिमेंट | १९.२ | २१.४ | १९.० | १७.९ | १९.५ | १९.४ |
| ७ साखर | ९.४ | १२.० | ८.८ | ९.२ | १०.६ | ९.९ |
| ८ कागद | १६.१ | १९.३ | १८.३ | १८.४ | १६.३ | १७.८ |
| ९ वनस्पती तेलें | १.७ | ०.६ | ०.६ | २.१ | — | ०.९ |
| १० रसायनें | ८.३ | ८.२ | ४.५ | ४.९ | ५.६ | ६.२ |
| ११ आगपेट्या | ७.४ | ६.९ | ७.८ | ७.२ | ८.० | ७.५ |
| १२ कोळसा | १०.६ | ८.८ | ८.७ | ७.७ | ८.६ | ८.८ |
| १३ वीज उत्पादन व पुरवठा | ३८.८ | ३६.७ | ३६.० | ३३.१ | ३२.४ | ३५.० |
| १४ शिपिंग | ५.० | १५.५ | १३.७ | ७.९ | ६.२ | ९.९ |
| १५ चहा | ३३.५ | १७.२ | २.६ | ३५.० | ४८.९ | ३०.५ |
| १६ इतर मळे | ४०.० | ४२.६ | ३५.७ | ३८.५ | ३७.५ | ३८.८ |
| १७ व्यापार | ३.० | २.५ | १.८ | १.८ | १.३ | २.१ |
| १८ जमीन व मालमत्ता | ३३.० | ४०.० | ३९.७ | ४३.८ | ४३.९ | ४०.० |
| एकूण (इतर धरून) | ९.५ | ९.६ | ७.१ | ८.८ | ९.६ | ८.९ |

# अर्थ

बुधवार, ता. २० फेब्रुवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आशिआंतील राष्ट्रांना फोर्ड फौंडेशनची मदत

आशिआंतील देशांचा औद्योगिक विकास करण्याच्या कामीं अमेरिकन सरकार मदत करीत असतें. त्याचप्रमाणें अमेरिकेंतील कांहीं खाजगी संस्थांहि कांहीं मदत करीत असतात. फोर्ड फौंडेशन ही अशाच प्रकारची एक संस्था आहे. संस्थेच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष मि. डोनाल्ड डेव्हिड हे सध्यां आशिआंतील कांहीं देशांचा दौरा करीत आहेत. त्यांनीं आपला ब्रह्मदेशाचा दौरा पुरा केला असून आतां ते भारतीय सरकारच्या विनंतीवरून भारताच्या तीन आठवड्यांच्या दौऱ्यावर आले आहेत. संस्थेकडून मिळणाऱ्या मदतीविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, संस्थेकडून ग्रामोद्धाराच्या योजनांना व माणसें शिकवून तयार करण्याच्या योजनांना मदत मिळते. संस्थेतर्फे चालू करण्यांत आलेलीं विकासकार्यें नंतर भारतीय सरकार आपल्याकडे घेतें. संस्थेतर्फे देण्यांत येणाऱ्या मदतीचा हेतु आशिआंतील देशांत लोकशाहीचा खराखुरा पाया घालण्याचा आहे. आशिआंतील देशांचा औद्योगिक विकास झाला तर जगाच्या ह्या भागांत शांतता कायमची टिकेल. आशिआंतील राष्ट्रांना संस्थेकडून जी आर्थिक मदत देण्यांत आली त्यापैकीं सर्वांत अधिक वांटा भारताला मिळालेला आहे. आशिआंतील पांच राष्ट्रांना मिळून फौंडेशनतर्फे १·५ कोटी डॉलर्स देण्यांत आले. त्यापैकीं ८० लाख ते १ कोटी डॉलर्स भारताला देण्यांत आलेले आहेत. इंडोनेशिआ, ब्रह्मदेश, भारत, पाकिस्तान व लेबॅनॉन हे पांच देश असे आहेत कीं जागतिक प्रश्नांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन व अमेरिकेचा दृष्टिकोन ह्यांच्यांत फरक नाहीं. शांतता व लोकशाही ह्या प्रश्नांबद्दल त्याच्यांत मूलगामी मतभेद नाहींत. फोर्ड फौंडेशनतर्फे दिली जाणारी मदत ही कोणत्याहि प्रकारच्या राजकीय अटी घालून दिली जात नाहीं.

---

## नवनव्या औषधांबद्दल इषारा

गेल्या वर्षांत पाश्चात्य देशांतील औषधांच्या कारखान्यांनीं कित्येक नवीन औषधें बाजारांत आणलीं आहेत. संशोधनपूर्वक बनविलेलीं हीं औषधें परिणामकारक नसतात असें नाहीं. पण त्यांचा अनिर्बंध वापर डॉक्टरांच्या सल्ल्यानें कां होईना करावा किंवा नाहीं हा मात्र वादग्रस्त मुद्दा आहे. पेनिसिलिनसारखें गुणकारी औषध सर्दीसारख्या क्षुल्लक आजाराला बरें करण्यासाठी पुष्कळदां देण्यांत येतें. आजारी माणसाला बरें होण्याची घाई होणें साहजिकच असतें. त्यांतच अलीकडील आर्थिक अस्थैर्याच्या जीवनाची भर पडते. म्हणजे असें कीं, मिळवत्या माणसाला तरी दीर्घकाल अगर वारंवार अंथरूण धरणें परवडत नाहीं. अर्थातच, आधुनिक औषधांचा उपचार घेऊन झटपट बरे होण्याकडे त्याचा कल झुकूं लागतो. नवीन औषधांचा उठल्या सुटल्या व त्वरित वापर करण्याविरुद्ध ब्रिटनमधील 'लान्सेट' ह्या सुप्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिकानें इषारा दिला आहे. कोठें दुखत खुपत असलें, अगर झोंप येत नसली अगर नुसतीच अस्वस्थता वाटत असली तर निरनिराळ्या प्रकारच्या गोळ्या वापरण्यांत येतात. 'लान्सेट' नें असा इषारा दिला आहे कीं ह्या औषधांमुळें शरीराची नवें रक्त बनविण्याची शक्ति कमी होण्याचा संभव असतो. अमुक एका औषधानें विशिष्ट प्रकारच्या रोग्यावर अनिष्ट परिणाम झाला असें निश्चितपणें सांगतां येणें कठीण आहे. पण नवीन औषधांमुळें पुष्कळदां रोग्याचें आरोग्य धोक्यात येतें, असें मात्र मानण्यास जागा आहे. म्हणून अशा प्रकारचीं औषधें वापरण्यांत संभाव्य धोका आहे इतकें तरी लक्षांत ठेवणें जरूर आहे.

---

## प्लॅस्टिकच्या वस्तूंसाठी परदेशी बाजारपेठा

भारतीय सरकारनें देशाचा निर्यात व्यापार वाढविण्यासाठी आठ एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलस् स्थापन केलेलीं आहेत. त्यांपैकीं एक प्लॅस्टिकच्या वस्तूंसाठी परदेशी बाजारपेठा मिळविण्यासाठी कामें करीत असतें. ह्या कौन्सिलतर्फे एक प्रतिनिधिमंडळ परदेशांच्या दौऱ्यावर गेलें आहे. एडन, आदिस अबाबा, मोंबासा, नैरोबी, दार–एस्–सलाम, खार्टूम, ह्या ठिकाणीं जाऊन तेथें प्लॅस्टिकच्या वस्तूंच्या खपास कितपत वाव आहे, ह्याची चौकशी ते करणार आहे. भारतांत प्लॅस्टिकचा धंदा नव्यानें आला असला तरी गेल्या कांहीं वर्षांत त्यानें चांगली प्रगति केली आहे. १९३६ मध्यें भारतांत प्लॅस्टिकच्या वस्तू करणारे अवघे ५ कारखाने होते. आतां कारखान्यांची संख्या १२० झाली आहे. त्याशिवाय ग्रामोद्योग–पद्धतीनेंहि ह्या वस्तूंचें उत्पादन करण्यांत येतें. रोजच्या उपयोगाच्या अशा कित्येक प्रकारच्या वस्तू भारतामधील कारखान्यांतून तयार होतात व त्या परदेशी मालाच्या स्पर्धेलाहि टिकतात. तथापि, गेल्या कांहीं वर्षांत परदेशी मालाची स्पर्धा अधिक जाणवूं लागली आहे. १९५३–५४ सालीं भारतानें १६ लाख रुपये किंमतीचा माल निर्यात केला. त्यापुढील सालीं १४·५ लाख रुपयांचा माल निर्यात केला आणि १९५५–५६ सालीं ८ लाख रुपये किंमतीचाच माल निर्यात केला. निर्यात कमी होण्यास देशांतील वाढती मागणी हेंहि एक कारण आहे. घटती निर्यात वाढविण्याचे प्रयत्न कौन्सिलतर्फे करण्यांत येत आहेत. ह्या धंद्यांत सुमारें ८ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून १५,००० कामगारांना धंद्यामुळें रोजगार मिळालेला आहे.

---

**पोलादाच्या कारखान्यांसाठी एंजिनिअर्स—** रुरकेला, भिलई व दुर्गापूर ह्या ठिकाणीं उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांत काम करण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशननें ४०० तरुण एंजिनिअरांची निवड केली आहे. त्यांना परदेशांत अधिक शिक्षणासाठी पाठविण्यापूर्वी टाटांच्या कारखान्यांत प्राथमिक तयारीसाठी धाडण्यांत येईल.

## बृहन्महाराष्ट्र सिंडिकेटला २०३ लक्ष रुपये नफा

### दि. १-१०-१९५५ ते ३० जून १९५६ या मुदतीचा संचालकांचा अहवाल

घसारा, मॅनेजिंग एजण्ट यांचें कमिशन, नोकरवर्गासाठी बोनसची तरतूद, प्राप्तीवरील व इतर कर यांची तरतूद आणि काँटिन्जन्सी तरतूद याखेरीज सर्व खर्चवेंच वजा जातां अहवालाचे कालावधींत रु. २८,३७,२४५–०–१० इतका नफा झाला आहे. त्यांतून (१) मॅनेजिंग एजण्ट यांचें कमिशन रु. १,६३,६२२–०–० व (२) घसारा रु. ५,९५,१८६–७–९ वजा जातां नफा रु. २०,७८,४३६–९–१ एवढा राहतो.

सदर रु. २०,७८,४३६–९–१ चे नफ्यांतून संचालक मंडळानें खालील तरतुदी केल्या आहेत :

| | |
|---|---|
| १. नोकरवर्गासाठी बोनसची तरतूद | रु. ३,००,००० |
| २. करासाठी तरतूद | रु. १०,००,००० |
| ३. काँटिन्जन्सीसाठी तरतूद | रु. ५,००,००० |
| एकूण | रु. १८,००,००० |

याप्रमाणें एकूण अठरा लाखांची तरतूद केल्यानंतर निव्वळ नफा रु. २,७८,४३६–९–१ राहतो. त्यांत गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ३६,२५७–६–१ मिळविल्यावर नफा वांटणीस रु. ३,१४,६९३–१५–१० रहात असून त्यामधून पुढीलप्रमाणें डिव्हिडंड देण्याबद्दल शिफारस आहे :–

| | |
|---|---|
| (१) दि. ३०–६–५६ अखेर प्रेफरन्स भागावरील वसूल झालेल्या भांडवलावर दरसाल दर शेंकडा (करमाफ) ५ टक्केप्रमाणें नफा वांटणीसाठी तरतूद | रु. १७,२६५– ०– ० |
| (२) दि. १–१०–५५ ते ३०-६-५६ अखेर संपणाऱ्या कालावधीच्या ऑर्डिनरी भागावरील वसूल झालेल्या भांडवलावर दरशेंकडा (करमाफ) १० टक्के प्रमाणें नफा-वांटणीसाठी तरतूद. | रु. २,३७,५००– ०– ० |
| (३) पुढील वर्षासाठी शिल्लक | रु. ५९,९२८–१५–१० |
| एकूण | रु. ३,१४,६९३–१५–१० |

आपल्या सिंडिकेटचे मॅनेजिंग एजण्ट कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांचे विशेष अविश्रांत परिश्रमामुळेंच वरील नफा झाला आहे. आपली कृतज्ञता आणि आभार स्वीकारण्यास ते हयात नाहींत याचेंच आम्हांस दुःख होत आहे.

अहवालाचे कालावधींत उसाचें दर एकरीं प्रमाण ४९५ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा शेंकडा ११·५२ टक्के मिळाला.

दि. ३०–९–५६ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्रफळ २००० एकर (आडसाली ऊंस १०२४ एकर आणि सुरू व खोडवा मिळून ९७६ एकर) आहे. सदरपैकी ९५ एकर पुढील वर्षाच्या नव्या पिकास बेण्यासाठी लागेल.

साखर सांठा विकण्याची परवानगी मिळण्यास भारत सरकारकडून विलंब लागतो ही सर्वांत मोठी अडचण अहवालाचे वर्षी जाणवली. दर महिन्याचा साखरेचा सरासरी सांठा ८०,००० पोत्यांचा म्हणजे सुमारें ६५ लक्ष रुपये किंमतीचा होता. नफा-तोटा-पत्रकावरून दि. ३०–६–५६ रोजीं साखरेचा सांठा रु. ६०,१६,७८९ एवढा होता असें दिसून येईल. साखरेचा वरील सांठा विकल्यावर १९५५–५६ सालाचे ताळेबंदांत दाखविलेली बँकेची कॅश क्रेडिटची सर्व रक्कम व्याजासह परत केली आहे. नवा हंगाम दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं सुरू झाला. २० जानेवारी, १९५७ अखेर नवीन हंगामाचें साखरेचें उत्पादन ७०,३१९ पोतीं झालें आहे. या हंगामांत १,६०,००० पोतीं साखर तयार होईल असा अंदाज आहे.

## बँकनोकरांचा महागाई भत्ता

### इंडेक्स नंबराप्रमाणें खालीहि जाणार

भारत सरकारनें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलकडे विचारणा करून, महागाई भत्त्याच्या योजनेबद्दल खुलासा मागितला. किमान किंवा कमाल महागाई भत्ता हा सहामाही अखिल भारतीय रहाणीच्या खर्चाच्या इंडेक्स नंबरांत मूळ १४४ च्या मानानें १० पॉइंटसपेक्षा ज्यास्तीनीं वाढ किंवा घट होईल त्याप्रमाणें ज्यास्त किंवा कमी करतां येईल किंवा नाहीं, असा सरकारचा प्रश्न होता.

इंडेक्स नंबर खाली गेला (म्हणजे महागाई कमी झाली) तर किमान किंवा कमाल महागाई भत्त्यांत फरक करूं नये; इंडेक्स नंबर वर गेला (म्हणजे महागाई वाढली) तर मात्र किमान व कमाल महागाईभत्त्यांत प्रमाणशीर वाढ व्हावी, असें नोकरवर्गाचें म्हणणें होतें.

ट्रायब्यूनलनें (श्री. जीजीभॉय, चेअरमन) किमान व कमाल महागाई भत्ता वरप्रमाणें खालीहि जावा, असा निर्णय केला; बँक ट्रायब्यूनलच्या योजनेला तें धरूनच आहे. नोकरवर्गाच्या म्हणण्याप्रमाणें, महागाईभत्त्याची आवश्यकता खूपच कमी झाली, तरी तो चालू ठेवावा लागेल. पण हें ट्रायब्यूनलच्या योजनेला धरून होणार नाहीं.


## पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक, लि., पुणें शहर

### पोस्ट बॉक्स नं. ५११, पुणें २.

बँकेस निरनिराळ्या वेतनश्रेणींत कांहीं जागा भरावयाच्या असून त्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

बी. ए., बी. कॉम., एलएल. बी. असे पदवीधर अगर मॅट्रिक, एस. एस. सी. व सहकारी विद्यालयाची डिप्लोमा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनीं आपले अर्ज दिनांक २८–२–१९५७ पर्यंत खालीं सही करणार यांचेकडे पोंचतील अशा बेतानें पाठवावेत.

मराठी व इंग्रजी टायपिंगचें उत्तम ज्ञान असणारांना अधिक पसंति देण्यांत येईल.

अर्जांत संपूर्ण नांव, पत्ता, वय, शैक्षणिक लायकी, पूर्वानुभव वगैरेंची तपशीलवार माहिती नमूद केली जावी.


मुलाखतीस बोलाविल्या जाणाऱ्या उमेदवारांस स्वखर्चानें यावें लागेल.

पुणें २.
ता. १३-२-१९५७

वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.

# जनता सहकारी बँक लि., पुणें

## शिवाजीनगर शाखेचें उद्घाटन



खुर्चीवरतीः—१ चेअरमन, श्री. दीक्षित, २ रजिस्ट्रार, श्री. राणा, ३ अध्यक्ष, डॉ. नामजोशी, ४ श्री. जी. आर. पालकर, ५ श्री. व्ही. डी. कारखानीस, ६ मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. द. शं. जमदग्नि.

रविवार, दि. ३ फेब्रुवारी, १९५७ रोजीं जनता सहकारी बँक लि. च्या शिवाजीनगर शाखेचें उद्घाटन रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज्, मुंबई राज्य, श्री. एफ्. एन्. राणा, आयु. ए. एस्. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळीं (१) बँकेचे अध्यक्ष, (२) बँकेचे चेअरमन व (३) उद्घाटक श्री. राणा, ह्यांनीं केलेल्या भाषणांचा सारांश येथें दिला आहे.

**डॉ. शं. श्री. नामजोशी, अध्यक्ष, ह्यांचें प्रास्तविक भाषण**

स्वातंत्र्यकाळानंतर हिंदुस्थानची आर्थिक उन्नति कशी करतां येईल याबद्दल हिंदुस्थानांतील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या नेमलेल्या समितीनें सहकारी आर्थिक जीवनामुळेंच हिंदुस्थानची आर्थिक उन्नति होईल असा आशावाद प्रकट केला आहे. त्यांतील नागरी भागांतील मध्यम व गरीबवर्गीयांना त्यांच्या उद्योगधंद्यासाठी व नोकरपेशांतील लोकांस त्यांच्या अडीअडचणींसाठी लागणारी आर्थिक व्यवस्था करून त्यांची आर्थिक नड भागविण्याचा प्रयत्न जनता सहकारी बँक लि. ही गेलीं सात वर्षे करीत आहे. सदर बँकेच्या या भागांतील बऱ्याच सभासदांनीं आणि हित-चिंतकांनीं येथें आमच्या बँकेच्या शाखेची मागणी केली आणि या इमारतीचे मालक रावबहादुर बोरावके साहेब यांनीं बँकेसाठी जरूर त्या सोईसह जागा उपलब्ध करून दिल्यामुळें ही शाखा सुरू करण्याचें बँकेनें हें धाडस केलें आहे.

**श्री. मा. ग. दीक्षित, चेअरमन, ह्यांचें अहवालवाचन**

धनिकांचें धन आणि निर्धनिकांचे कष्ट आणि प्रामाणिकपणा यांचें सहकार्य घडवून आणण्याचें काम एकाच विचारानें भारलेल्या आणि निस्वार्थपणानें काम करणाऱ्या लोकांनीं केल्यास मध्यम व गरीबवर्गीयांच्या आर्थिक अडचणींचा प्रश्न कांहीं प्रमाणांत तरी दूर करतां येईल या हेतुनें या बँकेची १९४९ च्या दिवाळी पाडव्यास स्थापना झाली.

पावसाळ्यांत उत्पन्न झालेल्या छत्र्याप्रमाणें युद्धकाळांत निर्माण झालेल्या सहकारी संस्थांचा फायदा लोकांस न मिळतां त्यांतील दोषांमुळें जनतेस आर्थिक झळ लागली. त्यामुळें स्वाभाविकच सहकारी संस्थांबद्दल सर्वसाधारण जनतेंत एक प्रकारची अप्रिति निर्माण झालेली होती. त्यांतच महायुद्धानंतर सुरू झालेल्या आर्थिक मंदीची भर पडली. त्यामुळें या नवीन बँकेच्या निर्मितीबद्दल आणि यशस्वितेबद्दल जनतेच्या मनांत साशंकता होती त्यामुळें पुणें शहरांतील अर्थतज्ज्ञ, पुढारी व सहकारी क्षेत्रांतील नाणावलेले कार्यकर्ते यांपैकीं कोणाचेंच नेतृत्व या बँकेस मिळूं शकलें नाहीं व बँक रजिस्टर करण्यास जरूर असलेलें भांडवलहि जनतेंतून उभारणें अवघड झालें. त्यांतच सहकारी खात्याकडून बँकेच्या रजिस्ट्रेशनला अपेक्षेपेक्षा लागलेला विलंब यांची वरील विरोधी वातावरणांत भर पडली. अशी विरोधी स्थिति असतांहि बँकेच्या प्रमोटर्समधील कार्यक्षमता आणि निःस्वार्थीपणा यावरील जनतेचा विश्वास आणि आपुलकी यामुळेंच केवळ या बँकेस भाग-भांडवल मिळूं शकलें आणि बँकेस सुरुवात झाली.

बँकेच्या सुरवातीस जरूर तें भाग-भांडवल मिळणें कठीण होतें तरी आज बँकेचें खेळतें भांडवल सात लाखांवर गेलें आहे. बँकेचे आज ४५० सभासद असून त्यांत पुणें कॉर्पोरेशन हद्दींतील सर्व व्यवसायांचे व सर्व तऱ्हांचे लोक असल्याचें दिसून येईल.

गेल्या सात वर्षांत कर्जप्रकरणीं बँकेस अपवादात्मकच लवाद करावे लागले आहेत. आज बँकेकडे निरनिराळ्या स्वरूपांत साडे-सहा लाखांच्या ठेवी आहेत. ह्या ठेवींशीं बँकेनें ठेवलेल्या तरत्या भांडवलाचें प्रमाण लक्षांत घेतल्यास कर्ज देण्याकडे व वसुली-कडे बँक जितक्या कटाक्षानें लक्ष देते तितक्याच काटेकोरपणानें ठेवीदारांच्या सुरक्षिततेकडे लक्ष देत असल्याचें दिसून येईल.

बँकेनें इतर व्यापारी बँकांप्रमाणें परगांवचे चेक्स, हुंड्या, बिल्स, वगैरे वसुलीची सोय केल्यामुळें, खातेदारांस त्याबाबत

व्यापारी बँकांत मिळणारी सर्व सवलत येथेंहि मिळूं शकतें. गरीब व मध्यमवर्गीयांसाठी काटकसरीची संवय लागावी म्हणून बँकेनें काटकसर योजना आंखली आहे. तसेंच सरकारच्या बचत-योजनेचा प्रसार व्हावा या दृष्टीनें नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स खरेदी करून देण्याची सोयहि बँकेनें करून दिली आहे.

जनतेंत बँकिंगचा होत असलेला प्रसार आणि जनतेस बँकांचें पटूं लागलेलें महत्त्व याचा विचार करतां सहकारी कायद्यांतील त्या बाबतच्या तरतुदी अपुऱ्या आहेत असें वाटतें. सहकारी नवीन संस्थांची संख्या वाढविण्यापेक्षां सध्यां चालू असलेल्या कार्यक्षम सहकारी संस्थांना जर कार्यक्षेत्र वाढवून दिलें तर या सहकारी संस्थांना कार्य करण्यास भरपूर वाव मिळेल आणि संस्थेच्या दृष्टीनें आर्थिक बचतही होईल असें वाटतें.

कोणत्याहि शास्त्राची वाढ ही त्यावरील केलेल्या संशोधनानेंच होत असते. सहकारी कार्यपद्धति हेंही एक शास्त्रच आहे; आणि हें शास्त्र प्रगत होण्यासाठीं त्यावर संशोधन होणें नितांत आवश्यक आहे. अशा संशोधनासाठी प्रयोगशाळा म्हणून आमच्यासारख्या कार्यक्षम नागरी सहकारी बँकांचा उपयोग सहकारी खात्यानें करून घ्यावा आणि प्रयोगांसाठी त्यांना कांहीं विशेष सवलती देऊन त्या संशोधनाच्या होणाऱ्या परिणामांचें अवलोकन करून इतर सर्व सहकारी संस्थांनाही केलेल्या प्रयोगांतील संशोधनाचा फायदा मिळवून दिल्यास सहकारी कार्यपद्धति अधिक यशस्वी आणि कार्यक्षम होईल असें आम्हांस वाटतें.

बँकेची कौतुकास्पद प्रगति : रजिस्ट्रार श्री. राणा यांचें भाषण

आपली बँक स्थापन होऊन आज सात वर्षें झालीं. इतक्या थोड्या अवधींतच बँकेनें आपली शाखा काढावी हें विशेष होय. आपल्या बँकेच्या गेल्या चार-पांच वर्षांच्या ताळेबंदांचा तुलनात्मक विचार करतां बँकेची हळूहळू सर्वांगीण प्रगति होत असल्याचें दिसतें. गेल्या ३० जूनपर्यंत बँकेनें भागरूपानें वसूल केलेलें भांडवल रु. ४३,९०० असून ठेवींच्या रूपानें जमा केलेली रक्कम रु. ५,२९,५२७-८-५ आहे. बँकेनें मिळविलेल्या ठेवींचा विचार करतां बँकेबद्दल ठेवीदारांत विश्वास निर्माण झाला आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कोणत्याहि संस्थेचें यश त्या संस्थेसाठी सतत झगडणाऱ्या व्यक्तींचे प्रयत्न व चिकाटी यांवर अवलंबून असतें. आपल्या बँकेच्या सर्वांगीण प्रगतीचें श्रेय मुख्यत्वेंकरून बँकेच्या चालकमंडळास आहे व त्यांनीं बँकेची जी प्रगति करून दाखविली आहे ती कौतुकास पात्र आहे.

नागरी बँकांनीं आपल्या व्यवहाराकरतां लागणारी रक्कम मुख्यत्वेंकरून स्थानिक ठेवी गोळा करून उभारावयाची असल्यानें अशा बँकांनीं आपल्यासंबंधीं योग्य तो विश्वास जनतेमध्यें निर्माण करणें फार महत्त्वाचें आहे. ह्याची सर्व जबाबदारी चालक-मंडळावर सहाजिकपणें येते. अशा प्रकारची चालकमंडळी जर सर्व नागरी बँकांना लाभली तरच नागरी बँकांना आपलें कार्य यशस्वीपणें करतां येईल.

मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांची पिळवणूक होऊं नये म्हणून सरकारनें सावकारी नियंत्रण कायदा जारी केला. त्यामुळें नागरी बँकांचें क्षेत्र आपोआपच वाढलें. या संधीचा नागरी बँकांनीं योग्य तो उपयोग करून घेऊन गरीब व मध्यमवर्गीयांस साहाय्य करण्यास पुढें आलें पाहिजे. हल्लीं आपलें सरकार ग्रामोद्योग, घरगुती उद्योगधंदे व हस्तव्यवसाय यांवर विशेष भर देऊन त्यांचे वाढीस उत्तेजन देत आहे. असे उद्योगधंदे चालविण्यासाठीं कर्ज अथवा अन्यरूपानें मदत देण्याकरतां स्वतंत्र औद्योगिक सहकारी बँका स्थापन होत आहेतच. परंतु ह्याहि क्षेत्रांत पाऊल टाकून घरगुती उद्योगधंदे व हस्तव्यवसाय यांवर अवलंबून असणाऱ्या कारागिरांस अथवा अशा कारागिरांनीं बनविलेल्या मालाचा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांस भांडवल पुरविण्याच्या दृष्टीनें नागरी सहकारी बँकांही कांहीं करूं शकतील किंवा कसें ह्या प्रश्नाचाहि विचार होणें आवश्यक आहे. आपली बँक ह्या संधीचा फायदा करून घेण्यास चुकणार नाहीं असा मला विश्वास वाटतो.

बँकेनें या विभागांतील सभासदांची व इतर जनतेची गैरसोय दूर करण्याकरतां शाखा उघडण्याचें ठरविलें. त्या शाखेचें आतां उद्‌घाटन झालें असें जाहीर करून आपल्या बँकेला उत्तरोत्तर यश मिळून तिची भरभराट होत जावो अशी इच्छा प्रदर्शित करून मी आपली रजा घेतों.

---

## निर्यातवाढीस चालना देण्याकरतां तज्ज्ञ समितीची स्थापना

**निर्यातवाढीसंबंधीच्या सर्व अंगांचा विस्तृत अभ्यास करण्यासाठी भारत सरकारनें तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे.**

देशाच्या निर्यात मालांत वाढ होण्याकरतां गेलीं कांहीं वर्षें भारत सरकारनें अनेक उपाय योजले. अशा उपाययोजनांत निर्यात वाढ मंडळांची स्थापना करणें, परदेशांतील बाजारपेठांची पाहणी करण्यासाठी व्यापारी शिष्टमंडळ पाठविणें, परदेशांत भारतीय वस्तूंची प्रदर्शनें भरविणें, परदेशांतील प्रमुख व्यापारी पेठांतून भारतीय व्यापारकेंद्रें व शो रूम्स उघडणें, तयार मालाच्या निर्यातीसाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाची सढळपणें आयात करणें, परदेशांतील व्यापारी प्रतिनिधींच्या कार्यक्षेत्रांत वाढ करणें आणि देशाच्या निर्यात व्यापारांत अडचणी दूर करणें यांचा अंतर्भाव होतो.

तथापि, देशाचा निर्यात व्यापार वाढविण्याकरतां व त्याद्वारें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस लागणारें परकीय चलन मिळविण्यासाठी सरकारला व व्यापारी वर्गास शक्य ते सर्व उपाय योजतां यावेत म्हणून या विषयाचा सांगोपांग अभ्यास करण्याची गरज वाटत होती.

आतां स्थापन करण्यांत आलेल्या तज्ज्ञ समितीस, निर्यात व्यापारवाढीसाठी करविषयक व इतर सवलती काय द्यावयास हव्यात व निर्यात व्यापारासाठी लागणाऱ्या क्रेडिटच्या सोयींचें स्वरूप व प्रमाण काय असावें या गोष्टी विशेषेंकरून लक्षांत घेऊन याबाबत शिफारशी सादर करावयाच्या आहेत. निर्यात वाढमंडळें वगैरे यंत्रणांच्या कामकाजाची पाहणी करून त्यांचा विकास कोणत्या प्रकारें व्हावा याबद्दलच्या आपल्या सूचनाहि ही समिति सादर करील. वाहतुकीच्या सोयी, व्यापारी कलह, माल बोटींत चढविण्यापूर्वीची पाहणी, दर्जा, नियंत्रण याबाबतच्या व्यापार-व्यवहारांत सुटसुटीतपणा आणणें यासंबंधींच्या शिफारशीहि तज्ज्ञ समितीकडून सादर करण्यांत येतील. ही समिति जून १९५७ अखेरपर्यंत आपला अहवाल सरकारला सादर करूं शकेल असा अंदाज आहे. डॉ. व्ही. एल. डीसोझा, म्हैसूर विद्यापीठाचे माजी व्हाइस चॅन्सेलर, हे समितीचे अध्यक्ष आहेत.

## जुन्या मुंबई राज्यांतील गेल्या दोन वर्षांमधील विकास कार्याचा आढावा

### (२)

#### दूधपुरवठा

मुंबईच्या आरे दूधवाडीची चांगली प्रगति होत आहे. तेथें २६ डेअरी फार्म असून एकूण १६००० जनावरें आहेत. येथून मुंबई शहरांतील १२ लाख लोकांना दुररोज सुमारें ४००० मण दुधाचा पुरवठा होतो. आनंदहून ८०० मण दूध आणलें जातें.

#### सहकार

मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीचाहि विकास होत आहे. सध्यां सहकारी सोसायट्यांची संख्या १८८४७ असून त्यांची सभासदसंख्या आणि खेळतें भांडवल अनुक्रमें २९६६५२६ आणि १२१·३३ कोटी रु. आहे. शेतकी पतपेढ्यांची संख्या १०००० असून ४००० विविधोपयोगी सहकारी सोसायट्या आहेत. शेतकी पतपेढ्यांच्या कक्षेंत आलेलीं खेडीं आणि ग्रामीण लोकसंख्या यांचें प्रमाण अनुक्रमें ७१·७ टक्के आणि ४१·३ टक्के आहे. शेतकी पतपेढ्या आणि विविधोपयोगी सोसायट्यांनीं शेतकऱ्यांना १०·५० कोटी रु. चीं अल्प मुदतीचीं कर्जें दिलेलीं आहेत. प्रोसेसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची स्थापना हें या क्षेत्रांतील दुसरें महत्त्वाचें वैशिष्ट्य होय. कोपरगांव येथें १९५६ सालीं एक सहकारी साखरकारखाना सुरू करण्यांत आला. अलिकडेच संसार (पुणें जिल्हा) येथेंहि एक सहकारी साखर-कारखाना सुरू झाला. मुंबई राज्यांत को-ऑपरेटिव्ह फार्मिंग सोसायट्यांच्या संस्था ३५७ आहेत.

मोठ्या प्रमाणावर सहकारी घरबांधणीचा उपक्रम हे या क्षेत्रांतील दुसरें वैशिष्ट्य होय. मुंबई राज्यांत १०६० सहकारी घर बांधणी संस्था असून त्यांचे ५५१७२ सभासद आहेत. मुंबई को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटीचे २५ सोसायट्यांना ७६५ गाळे बांधण्यासाठी ६०·०४ लाख रु. दिलेले आहेत.

#### मासेमारी

मुंबई सरकारनें मासेमारीच्या धंद्याला विकासासाठीं निरनिराळ्या योजना आंखल्या असून त्यांची प्रगति होत आहे. मुंबई राज्यांत मच्छिमार लोकांच्या ८० सहकारी संस्था आहेत. आणि यंत्रसज्ज मचव्यांची संख्या ९०० इतकी आहे.

#### समाजविकास आणि राष्ट्रीय विकास योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं मुंबई राज्यांत ११० समाजविकास आणि राष्ट्रीय विकास गटांनीं ८८३४ खेड्यांतील २७०८५ चौ. मैल क्षेत्र व्यापलें असून ७२१२७८० लोकांना त्यांचा फायदा होत आहे.

१९५५-५६ मध्यें या योजनांची खूपच प्रगति झाली. गेल्या दोन वर्षांमध्यें ४९००० एकर इतकी पडित जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली. १११ पैदास केंद्रें उघडण्यांत आलीं, २०२६००० झाडें लावून त्यांची जोपासना करण्यांत आली, आणि ७४४१३ एकर जादा जमिनीस पाण्याचा पुरवठा करण्यांत आला.

८६७ नव्या शाळांच्या इमारती बांधण्यांत आल्या आणि सुमारें २०० इमारती दुरुस्त करण्यांत आल्या. आतां नवीन शाळांच्या इमारती आणि दुरुस्त केलेल्या शाळांच्या इमारतींची संख्या अनुक्रमें १००० आणि ३०० पर्यंत गेली आहे. ८७३ नवीन शाळा उघडण्यांत आल्या असून २९३ शाळांचें मूलोद्योग शाळांमध्यें रूपांतर करण्यांत आलें आहे. प्रौढ शिक्षणकेंद्रांचा सुमारें २९००० प्रौढांना फायदा झाला. जून १९५६ अखेर एकूण ४५०० प्रौढ शिक्षणकेंद्रें आणि २००० करमणूककेंद्रें चालू होतीं. अहवालाच्या वर्षी ३०२ मैल पक्के रस्ते आणि ८२७ मैल लांबीचे कच्चे रस्ते बांधण्यांत आले. त्यामुळें दळणवळणाच्या सोयींमध्यें बरीच सुधारणा झाली. जुलै १९५४ ते जून १९५६ दरम्यान वेगवेगळ्या प्रकारच्या सुमारें १७४३ सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. शिवाय सहकारी तत्त्वावर ७५३७ घरें बांधण्यांत आलीं.

#### पाणीपुरवठा

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत आलेल्या पाणीपुरवठ्याच्या ३१ सरकारी योजनांपैकी, मार्च १९५६ पर्यंत नऊ योजनांचें काम पूर्ण करण्यांत आलें. नगरपालिकेच्या योजनेखालीं शहरी व ग्रामीण विभागांत ६८ पाणीपुरवठ्याच्या व गटारांच्या योजना पूर्ण करण्यांत आल्या आहेत.

#### कामगार कल्याण

मुंबई कामगार कल्याण मंडळाचा नवीन प्रयोग कामगार कल्याण क्षेत्रांत फार यशस्वी ठरला आहे. राज्यांतील कित्येक कामगारांच्या वस्तींत ५४ कल्याणकेंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. या केंद्रांत उपस्थित राहणाऱ्या कामगारांची संख्या १९५५-५६ मध्यें २ कोटींहून अधिक गेली आहे.

#### घरबांधणी

मुंबई घरबांधणी मंडळानें योजनेच्या कालावधींत ९८०० घरें बांधलीं. त्यांपैकी ५५८२ घरें पहिल्या दोन वर्षांतच पूर्ण झालीं होतीं. त्याशिवाय ३८८६ घरांचें बांधकाम चालूं होतें. औद्योगिक कामगारांचीं घरें बांधण्यास आर्थिक मदत देण्याच्या योजनेनुसार औद्योगिक कामगारांच्या २० सहकारी संस्थांना ११·४४ लक्ष रु. चें कर्ज व ६·५० लक्ष रु. ची आर्थिक मदत देण्यांत आली. या संस्थांनीं बांधलेल्या एकूण ४९६ घरांपैकी २५६ घरें १९५५-५६ मध्यें पूर्ण झालीं. ३३६ घरांचें बांधकाम चालूं होतें. कमी मिळकतींच्या लोकांकरितां घरबांधणी योजनेनुसार १२००० घरें बांधण्याकरितां ५२·१० लक्ष रु. चें कर्ज देण्यांत आलें. जुहु विलेपार्लें विकासयोजनेच्या अंतर्गत घरबांधणी मंडळाला घरें बांधणीच्या जागेसाठीं १४८६७९८रु. १९५५-५६ मध्यें आगाऊ देण्यांत आले व त्याचप्रमाणें भाडेंमालकीच्या तत्त्वावर घरें घेण्याकरितां घरबांधणीस १५ लक्ष रु. आगाऊ देण्यांत आलें. मुंबई सहकारी घरबांधणी अर्थसंस्थेनें २५ सहकारी घरबांधणी संस्थांना ६३·०४ लक्ष रु. चें कर्ज दिलें. ७६५ घरें या कर्जातून बांधण्यांत आलीं. निर्वासितांना घराबाबतच्या सवलती देण्यांत येत आहेत. १९५५-५६ पर्यंत १६६८५ घरें, ३४८ दुकानें, आणि १८ शाळांच्या इमारती बांधण्यांत आल्या. याशिवाय ६४२९ घरें व ३७५ शाळांच्या इमारतींचें बांधकाम चालूं होतें.

#### सडकांचा विकास

राज्य सरकारनें सडकांच्या विकासासाठीं १९५४-५५ मध्यें ८·०५ कोटी रुपये खर्च केले. याशिवाय १९५५-५६ मध्यें रस्तेविकासाच्या कार्यक्रमावर ८·१३ कोटी रुपये खर्चाचा अंदाज करण्यांत आला आहे. मार्च १९५५ अखेर ६६३·८१ मैल रस्तेबांधणीचे किंवा रस्त्यांच्या दुरुस्तीचें काम पूर्ण करण्यांत आलें व ४१५० मैल लांबीच्या रस्त्यांचें काम चालूं आहे. तसेंच ४३८ मैल लांबीचें सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बनविण्यांत आले व ४४ पुलांचें बांधकाम पूर्ण करण्यांत आलें.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली, चेअरमन

श्री. देवेंद्र आपया मंगाज, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१–३–५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २–०–० |
| चालू डिपॉझिट | „ | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | |
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.